**Q.P. Code : 08010**

**(वेळ : २½ तास)** **(गुण : ७५)**

**सूचना :** १. **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
२. **उजवी**कडील **अंक गुण** दर्शवितात.

१. प्लेटो व ऑरिस्टॉल यांनी अनुकृतीविषयी केलेल्या चर्चेचा परामर्श घ्या. १५

**किंवा**

कोलरिज, कोर्टहॉप आणि अर्नोल्ड यांनी मांडलेल्या काव्यव्याख्यांची विस्तृत चर्चा करा.

२. साहित्यभाषेतील रूपक, प्रतिमा व प्रतीक यांचे कार्य स्पष्ट करा. १५

**किंवा**

अनेकार्थता व अपरिचितीकरण या तत्त्वांच्या सहाय्याने साहित्यभाषा कशी घडते याविषयी विवेचन करा.

३. कोलरिजने मांडलेल्या कल्पनाशक्तीच्या प्रकारांची चर्चा करा. १५

**किंवा**

मार्क्सवादी विचाराचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करून 'सामाजिक बांधिलकी' ही कल्पना विशद करा.

४. ग्रीक तत्त्वज्ञ ऑरिस्टॉटल याने शोकान्तिकेसंदर्भात मांडलेल्या कॅथार्सिसच्या सिद्धान्ताची चर्चा करा. १५

**किंवा**

आय.ए.रिचर्डस् याच्या प्रेरणासंतुलनाच्या सिद्धान्ताच्या आधारे साहित्याच्या आस्वादाचे स्वरूप स्पष्ट करा.

५. (अ) पुढीलपैकी **कोणत्याही पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : १०

१) 'साहित्याद्वारे मानवी जीवनातील सत्त्वाचाच साक्षात्कार घडत असतो.' हा विचार कोणी मांडला आहे?
२) प्लेटोच्या ग्रंथाचे नाव लिहा.
३) 'कविता म्हणजे भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार असते.' अशी कवितेची व्याख्या कोणी केली आहे?
४) चमत्कृतीशक्तीची कल्पना कोणी मांडली आहे?
५) 'साहित्य हे जीवनाचे केवळ वास्तव दर्शन घडवत नसते, तर ते जीवनावर भाष्य देखील करत असते.' हा विचार कोणी मांडला आहे?
६) प्रतिमेची व्याख्या लिहा.
७) अनेकार्थतेची कल्पना कोणी मांडला आहे?
८) 'शोकान्तिकेच्या आस्वादामुळे मानवी मनातील भावनांचे कॅथार्सिस होते.' ही कल्पना सर्वप्रथम कोणी मांडली?

**TURN OVER**

munotes.in

आ) पुढील प्रश्नांची योग्य उत्तरे दिलेल्या पर्यायांतून निवडून लिहा : ५

१) 'उत्तम शब्दांची उत्तम रचना' असे कवितेचे लक्षण कोणी सांगितले आहे?
(अ) अर्नोल्ड (आ) कोलरिज
(इ) कोर्टहॉप (ई) ॲरिस्टॉटल

२) काव्यभाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य पुढीलपैकी कोणते आहे?
(अ) संगीत (आ) ताल
(इ) रूपक (ई) ध्रुपद

३) नियमोल्लंघनाची कल्पना कोणी मांडली?
(अ) रोमान याकोबसन (आ) कोलरिज
(इ) विल्यम एम्पसन (ई) यान मुकारोवस्की

४) कोलरिजच्या मते, साहित्यनिर्मितीच्या मुळाशी कोणती मानसिक शक्ती असते?
(अ) द्वितीय श्रेणीची कल्पनाशक्ती (आ) चमत्कृतीशक्ती
(इ) प्रतिभाशक्ती (ई) व्युत्पत्ती

५) साहित्याच्या आस्वादासंदर्भातील 'विशुद्धीकरणा'ची कल्पना पाश्चात्य साहित्यशास्त्रातील कोणत्या सिद्धान्तावर आधारित आहे?
(अ) अनुकृती (आ) प्रेरणासंतुलन
(इ) कॅथार्सिस (ई) अपरिचितीकरण

---

munotes.in